# दयानंद कला महाविद्यालय,लातूर

सुस्वागतम्

डॉ.आर.एस.पारवे

# 1857 चा उठाव

## 1857  उठावाच्या अभ्यासाचे उद्दिष्ट

1857 च्या उठावाची कारणमीमांसा करणे
1857 च्या उठावाची वाटचाल अभ्यासणे
अठराशे सत्तावन च्या उठावाचे परिणाम अभ्यासणे
उठावा बाबतच्या विविध मतांचा अभ्यास करणे

# 1857 च्या उठावाची कारणे

- राजकीय कारणे
- सामाजिक आणि धार्मिक कारणे
- आर्थिक कारणे
- तात्कालिक कारणे

# अ) राजकीय कारणे

## 1) लॉर्ड डलहौसी चे संस्थानांचे विलीनीकरण व खालसा धोरण

1848 मध्ये लॉड डलहौसी गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आला. डलहौसीने देशी राज्यांना ब्रिटिश साम्राज्यात विलीन करण्यासाठी, खालसा पध्दतीचा अवलंब केला. याबाबत त्याचे दोन मार्ग होते

- दत्ताक वारस नामंजूर या धोरणानुसार सातारा, झाशी, संबळपूर, जेतपूर, उदयपूर, नागपूर, इ. संस्थाने खालसा करुन कंपनीच्या राज्यात सामाविष्ट केली.
- गैरकारभार व अव्यवस्था या तत्वाखाली अयोध्येचे संस्थान खालसा केले. निजामाचा वऱ्हाड प्रांत.

## 2) कंपनीचे साम्राज्यवादी धोरण :-

- सन 1600 मध्ये व्यापार करण्यासाठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.
- भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टींग्ज व लॉर्ड डलहौसीने प्रचंड साम्राज्य विस्तार केला.
- कंपनीच्या राजकीय हस्तक्षेपामुळे ज्या संस्थानिकांच्या सत्ता नामशेष झाल्या ज्यांचे व्यापार, उद्योग बुडाले ते लोक असंतुष्ट झाले.

# 3) नानासाहेब पेशव्यांची पेन्शन रद्द

- पेशवा दुसरा बाजीराव याचा दत्ताक पुत्र नानासाहेब मिळणारी पेन्शन डलहौसीने बंद केली
- नानासाहेब पेशवे नाराज झाले
- नानासाहेब पेशव्यांनी अजीमुल्लाखान यांच्यामार्फत ब्रिटिश पार्लमेंट कडे न्याय मागितला पण यश आले नाही

# 4) बहादुरशहा जफरची बादशहा ही पदवी रद्द

- बहादुर शहा जफर अठराशे 37 सली बादशहा पदी विराजमान झाले.
- मोगल बादशहा बहादूरशहा च्या प्रती लोकांमध्ये आदर होता.
- मोगल सम्राट बहादूरशहाचा बादशहा हा किताब व त्यास मिळणारी पेन्शन रद्द करण्याचा प्रयत्न केला.

# 5) जमीनदारांमध्ये असंतोष

- ब्रिटिशांनी बंगाल, बिहार व ओरिसा प्रांतात जमिनदारी महसूल व्यवस्था सुरू केली
- त्यामुळे ब्रिटिशांचा अनुनय करणारा जमीनदार वर्ग भारतात निर्माण झाला.
- जमीनदाराने निश्चित केलेला सारा भरला नाही तर त्याच्या जमिनदारीचा जाहीर लिलाव करण्यात येत असे.
- प्रसंगी जमीनदाराची जमीनदारी जप्त करण्यात येई.
- त्यामुळे जमीनदार वर्गातही ही ब्रिटिश याविषयी असंतोष निर्माण झाला.

# 6) हिंदी शिपायावर निबंध

- हिंदी शिपायांना गंध लावणे व दाढी राखण्यास प्रतिबंध. (1806)
- लष्करातील उच्च अधिकार पदे भारतीय शिपायांना मिळत नव्हती.
- लष्करात एकाच पदावर काम करणाऱ्या भारतीय व ब्रिटिश शिपायांच्या वेतनामध्ये प्रचंड तफावत.
- लष्करी मोहिमा वर भारतीय शिपायांना सर्वात पुढे पाठवणे.
- भारतीय शिपायांना वेळोवेळी अपमानास्पद वागणूक मिळे.

# आ) सामाजिक आणि धार्मिक कारणे

## 1) वर्णभेद

- काळया लोकांपेक्षा गौरवणीर्य लोक जन्मत श्रेष्ठ आहेत. अशी भावना 19 व्या शतकात युरोपभर पसरली होती.
- भारतीय लोक रानटी व असंस्कृत आहेत अशी ब्रिटिशांची धारणा.
- भारतीयांना रेल्वेच्या फर्स्ट क्लास मधून प्रवासास प्रतिबंध.
- युरोपियन हॉटेल अथवा क्लबमध्ये भारतीयांना प्रवेश नव्हता.
- सामान्य ब्रिटिश व्यक्ती घोडागाडीतून रस्त्याने जात असेल तर भारतीय व्यक्तीने त्यास सलाम करणे बंधनकारक.

# 2) धर्मांतरास उत्तेजन

- धर्म परिवर्तन करणाऱ्या व्यक्तीस पैतृक संपत्तीचा हक्क.
- ख्रिश्चन मिशनऱ्यांना धर्म प्रसारास अनुमती
- अनाथ बालकांना सेवा सुविधा देऊन ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली जाई.
- ख्रिश्चन धर्म स्वीकाराणाऱ्यांना नोकरीत सामावून घेतले जाई व जे नोकरीत असतील त्यांना बढती दिली जाई.
- ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळांतून ख्रिश्चन धर्माची शिकवण दिले जाई.
- तुरुंगवास भोगणाऱ्या भारतीयाने ख्रिश्चन धर्म स्वीकारलयास मुक्त करत.

# 3) सुधारणा कायदे

- सती प्रतिबंधक कायदा (1829)
- जातिभेद रद्द करणारा कायदा (1850)
- विधवा पुनर्विवाह कायदा (1856)
- ब्रिटिशांनी वरील सर्व कायदे आपला धर्म बुडविण्यासाठीच् केले आहेत असा रुढीप्रिय भारतीयांचा समज झाला.

# इ) आर्थिक कारणे 1) भारतीयांची आर्थिक पिळवणूक

- भारतात अत्यंत कमी किमतीत कच्चा माल खरेदी करणे व तयार झालेला पक्का माल हुकमी बाजारपेठ म्हणून भारतात विकणे.
- भारतातील चहा, कॉफी, मसल्याचे, पदार्थ, खनिजे, लाकूड, इत्यादी माध्यमातून ब्रिटीशांनी आपले व्यापारावर वर्चस्व निर्माण केले.
- यामुळे ब्रिटनची भरभराट झाली. तर भारत दारिद्र्याकडे वाटचाल करु लागला याबाबत डॉ ईश्वरीप्रसाद म्हणतात, भारतमातेच्या दुधावर इंग्रज लठ्ठ झाले. परंतु भारतीयांवर यात उपासमारीची वेळ आली.

# 2) देशी उद्योगधंद्यांचा ऱ्हास

- 18 व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली.
- ब्रिटिशांनी आर्थिक साम्राज्यावादावर भर दिला होता.
- येथील कारखान्यांना लागणारा कच्चा माल भारतातून नेण्यात येऊ लागला व तयार झालेला पक्का माल भारतीय बाजारपेठेत आणून विकला जाऊ लागला.
- परिणामत भारतीय लघुद्योगातून तयार झालेल्या मालास उठाव राहिला नाही. त्यामुळे देशी उद्योगधंद्यांचा ऱ्हास घडून आला.

# 3) कारागिरांची बेकारी

- इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्यामुळे त्यांना कच्च्या मालाची गरज भासू लागली. ती गरज पूर्ण करण्यासाठी त्यांनी वासात वादाचा आश्रय घेतला◌ा◌ं. वसाहतवादी धोरणामुळे व्यापारात मक्तेदारी निर्माण केली
- ब्रिटिशांच्या व्यापारी धोरणामुळे येथील उद्योगधंदे बुडाले.
- परिणामी लक्षावधी कारागीरांवर बेकारीची वेळ आली.

# 4) नवीन महसूल व्यवस्था

- शेती हा भारतीयांचा प्रमुख व्यवसाय, त्यावरच लोकांची उपजीविका अवलंबून होती.
- शेतऱ्यांना उत्पन्नाच्या **2/3** हिस्सा कर म्हणून ब्रिटिश सरकारला द्यावा लागे.
- दुष्काळी परिस्थितीतही शेतसाऱ्यामध्ये सूट न देता उलट जो शेतकरी वेळेवर कर भरत नाही त्यांच्या जमिनींचे जाहीर लिलाव केले जात.
- ब्रिटिशांनी सर्व देशभर एकच शेतसाऱ्याची पध्दत न ठेवता वेगवेगळी ठेवली.
- लॉॅड कॉर्नवालिसने बंगाल, बिहार प्रांतात कायमधारा, पंजाब व आग्रा प्रांतात महालवारि तर मद्रास प्रांतात रयतवारी पध्दती सुरु केंली.
- ब्रिटिशांनी शेती सुधारण्यापेक्षा कर वसुलीकडे अधिक लक्ष दिले.त्यामुळे कराच्या ओझ्याखाली शेतकरी दबला गेला.

# ई) तत्कालीन कारण (काडतुस प्रकरण)

एनफिल्ड नावाच्या बंदुका मध्ये गाय व डुकराची चरबी असलेले आवरण दाताने तोडावे लागत असे

गाय हा प्राणी हिंदूंना पवित्र तर डुक्कर हा प्राणी मुस्लिमांना अपवित्र मानला जात असे

भारतीय सैनिकांनी चरबीयुक्त काडतुस वापरण्यास नकार

नकार दिलेल्या शिपायांना दहा वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली

मंगल पांडे या शिपायाने ब्रिटिश अधिकाऱ्यास ठार मारले


Thank You
shutterstock.com • 622486811